# एम . बी . मोरे महाविदयालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाची शैक्षणिक क्षेत्रभेट

एम . बी . मोरे फाउंडेशन कला, वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविदयालय धाटाव रोहा येथील वनस्पतीशास्त्र विभागाने कृषी विज्ञान केंद किल्ला रोहा येथे आज बुधवार दि . २२ जानेवारी २०२० रोजी शैक्षणिक क्षेत्रभेट करण्यात आली . महीला महाविदयालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा . सौ . दिपाली वारंगे आणि सहकारी प्रा . योगिता नेहेते यांनी प्रथम व्दितीय आणि तृतीय वर्ष वर्गातील विदयार्थ्यीनींना बागकाम कलम बनविणे फलोत्पादन विविध अवजार प्रयोगशाळेतील उपकरणे इत्यादींबाबत तपशिलवार माहीती मिळावी यासाठी या क्षेत्रभेटीचे आयोजन केले .

या क्षेत्रभेटीत डॉ . श्री . मनोज तलाठी यांनी विदयार्थ्यीनींना शेतीपर्यटन तसेच डॉ . श्री . राजेश मांजरेकर यांनी फलोत्पादनाचे विविध प्रकार आणि वनस्पतीशास्त्रामधील करिअरच्या संधी आणि प्रा . जीवन आरेकर यांनी मशरूम उत्पदनाबाबत माहीती दिली . या क्षेत्रभेटीत विदयार्थ्यीनीना रोपवाटीकेबरोबर प्रयोगशाळेतसुध्दा मार्गदर्शन मिळाले . प्रा . सुधाकर पाध्ये यांनी शेतीकामात झाडांबरोबर मातीचे परिक्षण करण्याकरीता आवश्यक उपकरणे आणि त्यांचे महत्व पटवून दिले . कृषी विज्ञान केंद्र रोहा चे प्राचार्य डॉ . श्री . सी . एस . कदम यांनी देखील विदयार्थ्यीनींना मार्गदर्शन केले .

महीला महाविदयालयातील वनस्पतीशास्त्र विभागातील ९९ विदयार्थ्यीनींनी यात सहभाग घेतला . कृषी विज्ञान केंद्र रोहा चे श्री . प्रमोद यलमर प्रा . सचिन कार्ले तसेच महीला महाविदयालयाचे प्राचार्य श्री . प्रसन्न म्हसळकर, प्रा . प्रतिमा भोइर प्रा . मनिषा जाधव प्रा . दिपेश भगत प्रा . नवकेश भगत आदी उपस्थित होते .

Scanned by CamScanner